पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
ईपीएबीक्स - ०२१७ २७४४७७० ते २७४४७७९ विस्तारीत क्रमांक (१३७)
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac & www.sus.ac.in

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

जा.क्र.पुअहोसोविसो/सनिवि/२०२२/ 7819 दि. 28 SEP 2022

प्रति,

सर्व उमेदवार

विषय: **मतमोजणी संदर्भात . . .**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिसभेसाठी (सिनेट) शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, पदवीधर मतदारसंघ, विद्या परिषद शिक्षक - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, अभ्यासमंडळे रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, इंग्रजी व शैक्षणिक मूल्यमापन यांची निवडणूक **गुरुवार दि.२९ सप्टेंबर, २०२२** रोजी एकूण १६ मतदान केंद्रावर घेण्यात येणार आहेत. या निवडणूकीची मतमोजणी **शुक्रवार दि.३० सप्टेंबर, २०२२** रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून सुरू करण्यात येईल. सदर मतमोजणी कार्यक्रम खालीलप्रमाणे:

१) मतमोजणी ठिकाण - संगणकशास्त्र संकुल, खोली क्रमांक ३०५

२) ३० सप्टेंबर, २०२२ - १) मतमोजणी सकाळी ठीक १०:०० वाजता सुरु होईल.

२) प्रथम मतदानकेंद्रनिहाय मतपेटीचे सील सर्व संबंधित घटकासमोर काढण्यात येईल. त्यानंतर पेपर अकाऊंटप्रमाणे मतपत्रिका टॅली केल्या जातील.

३) नंतर सर्व मतदान केंद्राच्या सर्व मतपत्रिका एकत्र केल्या जातील.

४) त्यानंतर खालील क्रमाने मतमोजणीस सुरुवात करण्यात येईल.

I) अधिसभा: १) विद्यापीठ शिक्षक (ST, Other) २) संस्थाप्रतिनिधी

II) अधिसभा: शिक्षक (SC, DTNT, OBC, Woman & Other)

III) विद्यापरिषद: शिक्षक (Sci. & Tech.)

IV रसायनशास्त्र अभ्यासमंडळ, प्राणीशास्त्र, इंग्रजी व शैक्षणिक मूल्यमापन अभ्यासमंडळ

V) अधिसभा: पदवीधर (ST, DTNT, OBC, Woman & Other)
(प्रथम सर्व केंद्रातील पदवीधर मतदार संघाच्या एकत्रित केलेल्या मतपत्रिकांचे १०० चे गठ्ठे केले जातील. त्यानंतर वैध व अवैध मतपत्रिका तपासल्या जातील आणि वैध मतपत्रिकेवर कोटा ठरविला जाईल.)

**वरील मतमोजणी क्रमामध्ये आवश्यकतेनुसार मा. निवडणूक निर्णय अधिकारी बदल करु शकतील.**

५) मतमोजणीवेळी प्रथम वरील मतदारसंघनिहाय वैध व अवैध मतपत्रिका वेगळ्या करुन कोटा निश्चित करण्यात येईल.

६) सदरची मतमोजणी प्रक्रिया सुरु झाली की संपेपर्यंत सुरुच राहील.

उमेदवारांनी / उमेदवारांच्या प्रतिनिधींनी दि.३० सप्टेंबर, २०२२ रोजी मतमोजणी हॉलमध्ये सकाळी ठीक ९:३० वाजता हजर राहण्याचे आहे. सील केलेल्या सर्व मतपेट्या तपासून सकाळी १०:०० वाजता मतपेट्या उघडण्यास सुरूवात करण्यात येईल. त्यानंतर उमेदवाराची कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. प्रत्येक दिवशी उमेदवार / प्रतिनिधी यांनी त्या-त्या दिवसाची मतमोजणी झाल्यानंतर मतपेटी सील करण्यासाठी थांबण्याचे आहे. अशावेळी कोणीही हजर नसल्यास कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी आपल्या सहीने मतपेटी सील करतील.

उमेदवारांनी / उमेदवारांच्या प्रतिनिधींनी आवश्यक त्या ओळखपत्रासह व प्रतिनिधींनी उमेदवाराने दिलेल्या अधिकारपत्रासह मतमोजणी स्थळी उपस्थित राहवयाचे आहे. संबंधित प्रतिनिधी हे ज्या त्या मतदारसंघाचे मतदार असणे आवश्यक आहे व त्याबाबतची नोंद अधिकारपत्रात असणे आवश्यक आहे.

मतमोजणीच्या कामामध्ये आपले सहकार्य अपेक्षित आहे.

धन्यवाद.

आपली स्नेहांकित,

२८/९/२२

(योगिनी घारे)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

Counting letter

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
ईपीएबीक्स - ०२१७ २७४४७७० ते २७४४७७९ विस्तारीत क्रमांक (१३७)
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac & www.sus.ac.in
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)



# मतमोजणी कार्यक्रम - २०२२

१) मतमोजणी ठिकाण - संगणकशास्त्र संकुल, खोली क्रमांक ३०५

२) ३० सप्टेंबर, २०२२ -
१) मतमोजणी सकाळी ठीक १०:०० वाजता सुरु होईल.
२) प्रथम मतदानकेंद्रनिहाय मतपेटीचे सील सर्व संबंधित घटकासमोर काढण्यात येईल. त्यानंतर पेपर अकाऊंटप्रमाणे मतपत्रिका टॅली केल्या जातील.
३) नंतर सर्व मतदान केंद्राच्या सर्व मतपत्रिका एकत्र केल्या जातील.
४) त्यानंतर खालील क्रमाने मतमोजणीस सुरुवात करण्यात येईल.
   I) अधिसभा: १) विद्यापीठ शिक्षक (ST, Other) २) संस्थाप्रतिनिधी
   II) अधिसभा: शिक्षक (SC, DTNT, OBC, Woman & Other)
   III) विद्यापरिषद: शिक्षक (Sci. & Tech.)
   IV रसायनशास्त्र अभ्यासमंडळ, प्राणीशास्त्र, इंग्रजी व शैक्षणिक मूल्यमापन अभ्यासमंडळ
   V) अधिसभा: पदवीधर (ST, DTNT, OBC, Woman & Other)
   (प्रथम सर्व केंद्रातील पदवीधर मतदार संघाच्या एकत्रित केलेल्या मतपत्रिकांचे १०० चे गठ्ठे केले जातील. त्यानंतर वैध व अवैध मतपत्रिका तपासल्या जातील आणि वैध मतपत्रिकेवर कोटा ठरविला जाईल.)

**वरील मतमोजणी क्रमामध्ये आवश्यकतेनुसार मा. निवडणूक निर्णय अधिकारी बदल करु शकतील.**

५) मतमोजणीवेळी प्रथम वरील मतदारसंघनिहाय वैध व अवैध मतपत्रिका वेगळ्या करुन कोटा निश्चित करण्यात येईल.
६) सदरची मतमोजणी प्रक्रिया सुरु झाली की संपेपर्यंत सुरुच राहील.

२८।९।२२

कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

Counting letter